# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
## विभागीय कार्यालय, पुणे

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

४१२/डी, बहिरट पाटील चौक, पुणे – ४११ ०१६.

दू.क्र. : ०२०–२५६५६९९४/२५६६०३१९ फॅक्स : ०२०–२५६५२३०८

ई–मेल : rbtepn@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क.मरातंशिम/विकापु/ परीक्षा शुल्क/२०१८/१४०७ दिनांक : ३०/११/२०१८

**ई वेबपरिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,
पुणे विभागीय कार्यालयाशी संलग्नीत सर्व संस्था

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिताचे विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ:-** १. शासन निर्णय महसूल व वन विभाग कं. एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७दि.२३/१०/२०१८.
२. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क. संकिर्ण-२०१८/प्र.क.३८१/तांशि-४, दि. ०५/११/२०१८.
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र कं.२ अ/एडीएम/२०१८/१४२६, दि. ०६/११/२०१८.
४.शासन निर्णय महसूल व वन विभाग कं. एससीवाय-२०१८ २/प्र.क.८९/म-७ दि. ०६/११/२०१८.
५.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क. संकिर्ण-२०१८/प्र.क.३८१/तांशि-४, दि. २०/११/२०१८.
६.मा. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र कं. मरातंशिमं/का-४०/(लले)/बी-९१/२०१८/२६१ दि. २९/११/२०१८

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन निर्णयान्वये परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत महसूल व वन विभागाच्या दि. २३/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशानुसार या विभागातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याकरीता शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग कं. एससीवाय-२०१८ २/प्र.क.८९/म-७दि.२३/१०/२०१८ अन्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील Trigger- 2 लागू झालेल्या १८० तालुक्यातील जे विदयार्थी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध अभ्यासक्रमांकरीता प्रवेशित झाले असतील अशा विदयार्थ्यांचे संबंधित विद्यापीठाचे/ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

२. परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याच्या अधिवासी असलेल्या व रुपये ८.०० लाख या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक मर्यादा असलेल्या विदयार्थ्यांकरीता लागू राहिल.

३. राजर्षी छत्रापती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत ५०% परीक्षा शुल्क अनुज्ञेय असल्याने विदयार्थ्यांना केवळ ५०% परीक्षा शुल्क माफी अनुज्ञेय राहील.

४. ही सवलत खालील विदयार्थ्यांना लागू असणार नाही.

a. ज्या विदयार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

b. जे विदयार्थी त्यास परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.

c. जे विदयार्थी बहिस्थ (External) म्हणून नोंदले असतील.

d. ज्या विदयार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहातात, नोकरी-धंदा करतात, परंतू त्यांच्या नावे शेत जमीन आहे अशा विदयार्थ्यांना.

तसेच शासन निर्णयामध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये परीक्षा शुल्क माफीची योजना दि. ०६/११/२०१८ च्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या २६८ महसूली मंडळातील गावंमधील रहिवासी असलेल्या विदयार्थ्यांकरीता लागू करण्यात येत आहे असे नमूद केले आहे. तसेच २०१८ या वर्षामध्ये यापुढे महसूली व वन विभागाने अन्य तालुक्यांमध्ये/मंडळामध्ये दुष्काळ जाहीर केल्यास अशा गावांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीची योजना लागू राहिल असेही नमुद केले आहे.

तरी या विभागाअंतर्गत सर्व संस्थांना कळविण्यात येते की, सदर परीक्षा शुल्क माफी करीता पात्र असलेल्या **विदयार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या तक्ता अ प्रमाणे Times New Roman Font मध्ये Excel Sheet मध्ये भरुन Pen Drive वर Soft Copy व संस्थेने प्रमाणित केलेली Hard Copy ची प्रत विभागीय कार्यालयात दि. १४/१२/२०१८ पर्यंत जमा करावी.**

30/11/18

(श्री. विजय एम.कोल्हे)
प्र. उपसचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :-

१. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. श्री. सी. डी. कापसे मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता.

तक्ता – अ

# परीक्षा शुल्क माफ करावयाच्या विद्यार्थ्यांची संस्था निहाय माहिती

## शैक्षणिक वर्ष २०१८-१९

संस्थेचे नाव –

संस्था क्र.

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचा नोंदणी क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव | अभ्यासक्रम व सत्र (Regular Only) | हॉलतिकिटची छायांकित प्रत | संदर्भ क्र.(१) नुसार Triggar-2 लागू झालेला तालुक्याचे नाव अथवा संदर्भ क्र.(४) नुसार दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या महसुल मंडळाचे नाव | Triggar-2 लागू झालेला तालुका अथवा दुष्काळग्रस्त गावचा रहिवासी असल्याचा पुरावा | पालकाचे प्रत्यक्ष राहण्याचे ठिकाण | रु.8 लाखा पर्यत वार्षिक उत्पन्न असल्याचा दाखला | राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत पात्र आहे का ? | परीक्षा शुल्क माफीची सवलत इतर शासकीय प्राधिकारणाकडून प्राप्त न झाल्याबाबतचे विद्यार्थ्यांचे हमीपत्र | शुल्क माफीची प्रत्यक्ष रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

सदर माहिती मी तपासली असून ती बरोबर असल्याची खात्री केलेली आहे.

प्राचार्यांचे नाव,

सही व शिक्का